## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५७७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१८/०९/२०१६

**१) पोलो कंपनीच्या बॅगमधुन नगदी पैसे व प्लॉस्टीकचे पिशवीत ठेवलेल्या एसबीआय चे एटीएम तसेच वाहन परवान्याची चोरी . :–**

दिनांक १८/०८/२०१६ रोजी २०.०० वा. ते १९/०८/२०१६ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी यशवंत प्रभुदास डहाट वय ४६ वर्ष रा. गोंदीटोला/सुकळी यांचे १ पोलो कंपनीची लाल काळया रंगाचे बॅग मधील नगदी ५०,०००/–रू. व प्लॉस्टीकचे पिशवीत ठेवलेले एसबीआय चे एटीएम कार्ड व वाहन परवाना, कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन गोंदीटोला/सुकळी येथुन चोरून नेल्याने मा. पोलीस अधीक्षक साहेब भंडारा यांचे पत्र क्र. कक्ष १६/गुन्हा कार्य./१३३६/१६ कार्यालय पोलीस अधीक्षक भंडारा दि. १५/०९/२०१६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा वरून कागदपत्र प्राप्त झाल्याने पोस्टे. सिहोरा येथे कलम ३७९ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**२) शेतावरील सोलर कंपाऊड तारची चोरी . :–**

दिनांक १२/०९/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीच्या शेतावर लावलेली सोलर कंपाऊंड तार अंदाजे ४० मीटर कि. ७,६००/–रू. चा माल पाहुणगाव शेतशिवार येथुन चोरून नेल्याने फिर्यादी गोविंदा पिन्टु फोंडे वय ५९ वर्ष रा. पाहुणगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो. स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) विवाहीतेवर जबरी अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०९/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील आरोपीतांनी फिर्यादीस घरी तुझे लग्नाचे मागणीचे पैसे देतो तु आमच्यासोबत चाल असे बोलल्याने फिर्यादी ही आरोपीतांचे सोबत गेली आरोपीतांनी तीला घरी न नेता रोडलगत शेतबांधीत नेऊन फिर्यादीस जमीनीवर पाडुन तिचे सोबत जबरी अत्याचार करून तु कोणाला सांगीतले तर तुला जिवाने मारू अशी धमकी दिली असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे अप क्र. ००/१६ कलम ३७६(ड),५०६ भांदवि. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पोस्टे. करडी येथे कलम ३७६(ड),५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. बोरकुटे पो. स्टे. करडी हे करीत आहेत.

**४) विवाहीतेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १६/०९/२०१६ रोजी २१.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या घरी स्वयंपाक करीत असतांना आरोपीने फिर्यादीचे घरी जावुन दार ठोकुन फिर्यादीने दार उघडल्यावर आरोपीने घरात प्रवेश करून घराचे दार बंद केला व फिर्यादीस १००/–रू. घे तिच्या सोबत अश्लिल कृत्य करून तिचा विनयभंग केल्याचे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५२,३५४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

५) बासाच्या काठीने डोक्यावर व उजवे हाताच्या मनगटावर मारुन जखमी केले :–

दिनांक १६/०९/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील फिर्यादी भगवान नथुजी वाघाये वय २८ वर्ष रा. केसलवाडा हा आरोपीच्या घरी पाऊस येत असल्याने गेला असता आरोपीने फिर्यादीस दारू पाज असे म्हणाल्याने फिर्यादीने माझ्याजवळ पैसे नाही असे बोलला असता आरोपीने फिर्यादीसोबत भांडण करून रागाच्या भरात बासाच्या काठीने फिर्यादीचे डोक्यावर, उजवे हाताच्या मनगटावर मारून जखमी केले असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक १७/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. लाखांदुर येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९०० मिली लिटर देशी दारू एकुण कि. २५०/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

प्रभारी पोलीस अधिकारी
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६१९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.